# बखर वाड्:मय : मराठीतील ऐतिहासिक दस्त ऐवज

**प्रा.डॉ.दिपक रिटे**
**विज्ञान महाविद्यालय मराठी विभाग सांगोला, जि.सोलापूर.**

---

**प्रास्ताविक:-**

मराठी साहित्याला खूप प्राचीन प्रत्येक कालखंडात वेगळा वाड्:मय उदयास आलेला आहे. मराठी साहित्याच्या प्रारंभापासून महानुभव ते ज्ञानेश्वर आणि संत रामदास यांच्यापासून पडिती वाड्:मय शहिरी आणि बखर वाड्:मय यांचा उल्लेख करावा लागतो. कोणत्याही वाड्:मय प्रवाहाचे योगदान त्या त्या काळात असेल तरी त्याची निर्मिती आणि एकूण भोवतालचे वातावरण याचा प्रभाव जाणवतो.

मराठी साहित्यातील बखर वाड्:मय हा समृध्द मराठे शाहीच्या उदयाचा आणि त्यांच्या पराक्रमाचा दे दिव्यमान इतिहास, सामाजिक राजकिय परिस्थिती व कर्तृत्व संपन्न व्यक्ति महत्त्व याच्या पराक्रमाला साद घालण्याचे त्यांचे व्यक्तीमत्त्व शब्द-बध्द करण्याचे काम बखरकारांनी केले. त्यांच्या समकालीन जीवनातील लोकांच्या अनुभवाचे उग्र भीषण वास्तव बखर वाड्:मयातून व्यक्त झाले आहे हे सर्व काही लिहिताना त्यांच्या जवळ आपल्या धान्याच्या प्रती असणारा नितांत आदर त्यांच्या लेखनातून व्यक्त झाला आहे. सतराव्या शतकात स्वराज्य स्थापना झाली आणि याच काळात मराठीला, राज भाषेचे स्वरुप प्राप्त करुन देण्याचे कार्य बखर वाड्:मयाने केले असे म्हणता येईल.

**खबर म्हणजे काय:-**

खबर या अरबी शब्दाचा विपर्यास होवून बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. बक म्हणजे बकणे म्हणजे बोलणे या धातूपासून बखर शब्दाची निर्मिती झाली आहे. इति राजवाडे यांच्यामते पूर्वेच्या काळी बखर वाड्:मय हे लिहिले जात नव्हते तर मौखिक पध्दतीने त्यांची निर्मिती होत होती. काही अभ्यासकांनी रुढ अर्थाने राजकिय स्वरुपाचे ऐतिहासिक लेखन असा त्याचा उल्लेख केला आहे. मराठे शाहीच्या काळात जरी बखर वाड्:मयाला महत्त्वाचे स्थान प्राप्त झाले असले तरी इंग्रजी काळात तसेच मिशनरी चळवळ विषयक काही पौराणिक व धार्मिक स्वरुपाचा बखरी लिहिल्या गेल्या आहेत. बखर वाड्:मयाच्या दृष्टिने महिकावतीची बखर ही सर्वात जुनी बखर होय. बखरीचे खालील वर्ग पडतात.

१. समकालीन बखर यामध्ये राजकिय घटना प्रसंगावर आधारीत रचना केला जाते.
२. केवळ स्मृतीवर हवाला ठेवून काही दंतकथा पारंपारिक हेकीगती यांच्या आधारे उत्तरकालीन बखरी लिहिल्या गेल्या आहेत.
३. जुनी कागदपत्रे ऐतिहासिक ग्रंथ यांच्या सहाय्याने ही काही बखरीची रचना झाली आहे.
४. ऐतिहासिक पध्दतीने लेखन करुन व बखर हे नाव न देता ही उदा.कैफियत हकीगत चरित्र इत्यादी देखील यामध्ये समावेश करता येईल.
५. राजकिय सामाजिक व ऐतिहासिक स्वरुपाचे विषय नसूनही परंतू बखर हे नाव आहे. आधाही पौराणिक व सांप्रादायिक स्वरुपाच्या लेखनाचा बखर वाड्:मयाचा यामध्ये उल्लेख करता येईल.

**समारोप:-**

मराठी साहित्यात बखर वाड्:मयाचे योगदान महत्त्वाचे आहे. बहुतेक सर्व बखरीचे लेखन गद्यातून झालेले आहे. अपवाद फक्त महिकवितीची बखर ही गद्यपद्य मिफित आधी आहे, एकूण बखर वाड्:मयाचा प्रकार वेगळा आसलातरी प्रारंभ पुराण पध्दतीचा असावा तरी शेवट गोड झालेला असतो.